N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मानवत

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0251 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/05/2024 02:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 21/05/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/05/2024

**Time From (वेळेपासून):** 13:53 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/05/2024 **Time (वेळ):** 00:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2024 00:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हाटकर समाज मंगल कार्यालयाच्या ,समोर,नारायण नगर मानवत,मानवत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अक्षय संपतराव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मानोली,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मानोली,मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9657056970

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गजानन रामभाउ जंत्रे | | | 1. पोस्टे मानवत,मानवत,परभणी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | मुन्तसिर खान कबीरखान | | | 1. कुरेशी गल्ली तालाब कट्टा, मानवत,मानवत,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 100 नोटा | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि 21/05/2024

मी अक्षय संपतराव शिंदे, वय 26 वर्ष व्यवसाय क्रेशरवरून गिट्टी वाहतुक, रा. मानोली, ता. मानवत, जि. परभणी मो. न. 9657056970. समक्ष पोलीस ठाणे मानवत, जि. परभणी येथे फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन क्रेशरवर गिट्टी वाहतुक करुन कुंटुंबाची उपजिवीका भागवितो.

दि 19/05/2024 रोजी मी ACB परभणी येथे हजर येऊन पोउपअ इप्पर यांना माझी एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे सांगून त्यांना मी लेखी तक्रार दिली की, शेती करित असतांना धंदा करावा म्हणुन गिट्टी क्रेशरवर, गिट्टी वाहतुक करण्यासाठी हायवा हा दिपक किशनराव मिरपुडे यांचे कडुन बॉन्ड पेपर वर खरेदी केला आहे. त्याचा रजिस्ट्रेशन नंबर एम.एच.40 वाय. 2068 असा असुन. तो मी दहे स्टेन क्रेशरवर भाडयाने दिला आहे.

मला घर बांधकाम करायचे असल्याने रेतीची आवश्यकता होती. म्हणुन डाकु पिंपरी येथील माझे मित्राने मला रेती दिली. ती घेवुन माझा ड्राईव्हर नामे अनिलराव दहे हा दि. 02/04/2024 रोजी मानोलीकडे येत असतांना इटाळी शिवारात पो.स्टे. मानवत चे पि.एस.आय. गजानन जंत्रे यांनी माझा ट्रक, ड्राईव्हर आणि माझेवर पो.स्टे. मानवत येथे गुन्हा रजिस्टर नं. 159/2024, कलम 379, 34 भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल केला. त्यानंतर ड्राईव्हरला लगेच अटक केली. मी दुस-या दिवशी कोर्टापुढे हजर झालो. माझा आणि ड्रायव्हरचा दोन दिवस पि.सी.आर. घेतला. पि. सी.आर. मध्ये त्यांनी माझे कपडे काढुन मला हात वर करून बसवुन त्रास दिला आणि मला 10,000/- रू. लाचेची मागणी केली. दोन दिवसानंतर मी जामीनावर बाहेर आलो व ट्रक सोडविण्यासाठी मा. कोर्टाकडे वकीलामार्फत अर्ज दिला आहे.त्यानंतर कोर्टातुन आय.ओ. टु से देण्यासाठी आदेश निघणार आहेत. पो.स्टे. मानवतचे पि.एस.आय. गजानन जंत्रे यांनी माझे ड्राईव्हरचे फोनवर फोन करून मला सांगितले की तुम्ही हायवा ट्रकचा टॅक्स भरला नाही. तो टॅक्स भरावा लागेल आणि वरून आम्हाला एक लाख दहा हजार रूपये द्यावे लागतील तेंव्हाच तुमचा ट्रक सुटेल तसेच मी तुम्हाला तुमच्या विरूध्द दाखल गुन्हयाच्या तपासात आणि पोलीस कस्टडी रिमांडमध्ये मदत देखील केली आहे.ते मागत असलेली रक्कम ही लाच आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी त्यांना आज रोजी भेटण्यास जाणार आहे. त्या दरम्यान त्यांनी स्वतः किंवा इतरा मार्फत लाचेची मागणी करून ती स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी.

मी दिलेल्या तक्रारीवरून पोउपअ इप्पर एसीबी, परभणी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प परभणी येथील पंच नामे 1. श्री चैतन्य उमाकांत कनप, वय 27 वर्ष , सांखिकी अन्वेषक, आरोग्य विभाग, जि.प परभणी, 2.श्री दिगंबर पांडुरंग गवाले, वय 50 वर्षे आरोग्य सेवक जि.प परभणी यांना पंच म्हणुन घेतले. त्यांना माझी लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यांनी तक्रार वाचुन तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पडताळणी कार्यवाही करण्याकरीता संपुर्ण सापळा पथक दोन्ही पंचासह शासकीय वाहनाने व मी माझे मोटार सायकलने मानवत शहराजवळील आडोश्याच्या ठिकाणी एका शेतामध्ये येवुन थांबलोत. त्यानंतर सदर ठिकाणी शासकीय वाहनामध्ये पोउपअ इप्पर साहेब यांचे सुचनेवरुन पोशि/ कदम यांनी डिव्हीआर बाबत माहिती देवुन डिव्हीआर मध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकुन वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर मी माझे मित्रांकरवी Psi जंत्रे यांचेबाबत माहिती घेतली असता ते पोस्टे मानवत येथे हजर नसल्याचे कळाले. माझे विनंतीवरून ही कार्यवाही थांबवुन दि. 20/05/2024 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.दि. 20/05/2024 रोजी मा. पोउपअ इप्पर यांचे सुचनेवरून मी मानवत येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी हजर झालो. पडताळणी कार्यवाहीस सुरूवात झाली. पोस्टे मानवत येथे जावुन psi जंत्रे यांची भेट घेवुन त्यांचेवर लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोउपअ इप्पर यांचे सुचनेवरुन पोशि/ कदम यांनी डिव्हीआर चालु करुन माझ्या शर्टच्या आतील बाजुस गळयात लटकावला. पंच क्र.01 कनप यांचे सह माझे मोटारसायकल एम.एच.22 ए.एच. 6394ने psi जंत्रेयांची भेट घेवुन पडताळणीसाठी आम्हा दोघांना रवाना केले.पडताळणी कार्यवाहीत पोस्टे मानवत येथे प्रथम माझी भेट psi जंत्रे यांचे जवळ काम करणारा खाजगी इसम पठाण यांचे सोबत झाली. त्याने मला सदरवेळी pcr मध्ये मदत केल्याबद्दल बाकी असलेले 10,000/- रूपये

पोलीस ठाणे सत्यमेव जयते पो.स्टे.मानवत

लाच मागणी केली. काही वेळाने psi जंत्रे हे पोस्टे मानवत येथे आल्याने त्यांच्यासोबत माझी भेट झाली. त्यांनी मला rto चा दंड भरून येण्यास सांगितले. हायवा सोडण्यासाठी कोर्टामध्ये loचा रिपोर्ट देण्याचा आदेश आला नसल्याचे सांगितले व पंचाची चौकशी केली.त्यामुळे psi जंत्रे हे आज माझ्याकडे लाच मागणी करणार नाहीत म्हणुन मी सापळा पथकास विनंती केली की, सदर कार्यवाही स्थगित करुन दि 21/05/2024 रोजी सापळा कार्यवाही करण्यात यावी. माझे विंनती वरून psi जंत्रे यांच्या विरूध्द दि. 21/05/2024 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यावरुन दि 20/05/2024 रोजी तात्पुरत्या स्वरुपात कागदी पाकीटात व्हाईस रेकॉर्डर सिलंबद करुन ठेवण्यात आला. त्यानंतर मी माझ्या वकीलाकडे जावुन हायवा परत मिळण्यासाठीच्या अर्जावर पोलीसांचे म्हणने सादर करणेसाठीचा आदेश हस्तगत केला. तो आदेश तपासी अधिकारी जंत्रे यांना उदईक रोजी देवुन त्यांची भेट घेणार आहे.त्यानंतर मला रात्री खाजगी इसम पठाण याचा फोन आला व त्यांनी मला ऐकटे भेटण्यासाठी बोलविले. मी त्यास गावी गेलो आहे. मी उद्या मानवत येथे येतो असे सांगितले. त्यानंतर मी पोउपअ इप्पर यांना फोन करून सांगितले की,मला खाजगी इसम पठाण याचा फोन आला होता व तो मला एकट्याला भेटण्यास बोलवत होता. सोबत कोणी इतर इसम आल्यास साहेब बोलणार नाहीत असे त्यांनी मला सांगितले. मी त्यास उद्या येतो असे कळविले होते. दि. 21/05/2024 रोजी मला पोउपअ इप्पर यांनी संपर्क करून मानवत येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले. मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर सापळा पथकाने दि. 20/05/2024 रोजीचे तात्पुरत्या स्वरूपात पाकीटात सिलबंद केलेले डिव्हीआर मला व पंचाना दाखविले. मी व पंचानी त्याबाबत खात्री केली. त्यानंतर मला पोस्टे मानवत येथे पंचासह जावुन psi जंत्रे यांची भेट घेवुन त्यांचेवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. पोउपअ इप्पर यांचे सुचनेवरुन पोशि कदम यांनी डिव्हीआर चालु करुन माझ्या शर्टच्या आतील बाजुस गळयात लटकावुन दिला. त्यानंतर पंच क्र.01 कनप यांचेसह मोटारसायकल क्र एमएच 22 एएच 6394 ने psiजंत्रे यांची भेट घेवुन पडताळणी करण्यासाठी आम्हा दोघांना रवाना केले. मी व पंच पोस्टे मानवत येथे आलो.त्यानंतर psi जंत्रे बसत असलेल्या रूममध्ये जावुन त्यांना कोर्टाच्या से चा कागद दिला. त्यानंतर माझे psi जंत्रे व खाजगी इसम पठाण यांच्यासोबत झालेल्या चर्चे दरम्यान हायवा ट्रक सोडण्याच्या कोर्टातील अर्जावर से देण्यासाठी तसेच पी.सी.आर. मध्ये मदत केल्याबद्दल बाकी असणारे 10,000/-रू असे एकुण70,000/- रु तडजोडीअंती लाचेची मागणी करुन लाच रक्कम खाजगी इसम पठाण यांचे हस्ते स्विकारण्याची समंती दिली. मीpsi. जंत्रे यांना विनंती केली की 50,000/- रू तास भरात आणुन देतो व नंतर कोर्टामध्ये से दिल्यानंतर 20,000/- रू देतो. त्यावर psi जंत्रे व खाजगी इसम पठाण यांनी संमती दिली. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी मी पंचासह परत आलो.

psi जंत्रे यांनी मागणी केलेली लाच रक्कम 50,000/- रु ज्यात 500 रु दराच्या 100 नोटा मी सापळा पुर्व व सापळा कार्यवाहीत पंचासमक्ष हजर केली. सदर रकमेच्या नोटांचे क्रमांक एका को-या कागदावर लिहुन घेतले व नोटाचे फोटो काढले. त्यानंतर पोशि शेख यांनी अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्माबाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर मी जमा केलेल्या लाच रकमेस अॅंथ्रासिन पावडर लावुन ती माझ्या अंगावरील पँटच्या उजव्या बाजुच्या खिशात अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पोशि कदम यांनी डिव्हीआर चालु करुन देवुन मला पंच क्र1 कनप यांचेसोबत माझ्याजवळील मोटारसायकलने पोस्टे मानवत कडे रवाना केले. आमच्या पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. मी पोस्टे मानवत समोर येवुन खाजगी इसम पठाण यांना फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, तुम्ही तेथेच थांबा मी थोडया वेळात तेथे येतो. थोडया वेळाने खाजगी इसम पठाण यांचा मला फोन आला व त्यांनी मला शिवाजी पुतळयाजवळ येण्यास सांगितले. मी पंचासह तेथे गेलो आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील तेथे आले. खाजगी इसम पठाण याने मला त्याच्या मोटार सायकलच्या मागे येण्यास सांगितले. मी खाजगी इसम पठाण यांच्या मोटार सायकलच्या मागे गेलो त्याने हाटकर समाज मंगल कार्यालयाच्या समोर, नारायण नगर येथे मोटार सायकलचा वेग कमी केला. लागलीच माझ्या कडील 50,000/- रू. लाच रक्कम मागितली. माझ्यामध्ये आणि सापळा पथकामध्ये अंतर पडल्यामुळे मी त्यांना रक्कम देण्यासाठी वेळ घेतला असता त्यांनी मला लवकर रक्कम देण्या विषयी इशारा केला. मी त्यांना म्हणालो जंत्रे साहेबांना रक्कम मिळाल्याबद्दल फोन करा. तेव्हा ते मला म्हणाले फोनची गरज नाही. लवकर रक्कम दे. मी त्यांना लगेच रक्कम देवुन टाकली ते लाचेची 50,000/- रू रक्कम घेवुन मोटार सायकलवरून पळुन गेले. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या पध्दतीने गळयातील रूमाल काढुन खाजगी इसम पठाण यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला परंतु तो पर्यंत खाजगी ईसम पठाण त्या ठिकाणावरून निघुन गेला. त्यानंतर माझ्या मोटार सायकलवर पोउपअ इप्पर यांना घेवुन सापळा पथकासह मी त्यांचा परिसरात शोध घेतला परंतु ते मिळुन आले नाहीत. 13.53 वा. माझ्या गळयातील डीव्हीआर पोशि कदम यांनी बंद केले. त्यानंतर खाजगी इसम पठाण हा पळुन गेल्यामुळे संपुर्ण सापळा पथक psi जंत्रे राहत असलेल्या पाथरी रोडवरील रूमकडे निघाले. psi जंत्रे यांना पोउपअ इप्पर यांनी ताब्यात घेतले. व

पठाण यांना फोन लावण्यास सांगितले. psi जंत्रे याने खाजगी इसमास फोन लावण्यास नकार दिला. लागलीच पोनि जकिकोरे यांच्या मार्फत पंचासमक्ष psi जंत्रे यांच्या घराची घरझडती घेतली. नंतर पोउपअ इप्पर यांनी गोपनिय माहिती काढुन शिताफीने त्यांच्याकडे काम असल्याचा बहाना करून खाजगी इसम पठाण यास पोलीस स्टेशन मानवत येथुन ताब्यात घेतले. त्यास लाच रक्कमेबाबत विचारले असता तो उडवा-उडवीची उत्तरे देवु लागला व त्याने लाच रक्कम दिली नाही.पंचासमक्ष त्यांच्या हाताची व पॅन्टच्या खिशाची अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता उजव्या हाताच्या बोटाच्या पे-यास आणि त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशास अॅन्थॉसीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यावरून खाजगी इसम मुन्तसिरखान कबिरखान पठाण याने लाच रक्कम स्विकारून कुठेतरी लपवुन ठेवली असल्याने लागलीच पंचासह त्यांच्या घराची घरझडती घेतली परंतु लाच रक्कम मिळुन आली नाही. त्यामुळे पठाण हे लाच रक्कम घेतल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी गेले होते. त्याठिकाणी पोउपअ इप्पर सापळा पथक व पठाण यास सोबत घेवुन त्या ठिकाणी गेले परंतु लाच रक्कमेबाबत काहीएक माहिती मिळुन आली नाही

.आज दि. 21/05/2024 रोजी psi गजानन रामभाऊ जंत्रे व खाजगी इसम मुन्तसिरखान कबिरखान पठाण यांनी माझ्या विरूध्द दाखल गुन्हयात जप्त केलेला माझा हायवा ट्रक सोडण्याच्या अर्जावर मा. कोर्टामध्ये से देण्यासाठी व pcr मध्ये केलेली मदत म्हणुन एकुण 70,000/- रु लाचेची मागणी केली. त्यातील 50,000/- रू मुन्तसिरखान पठाणकडे देण्याचे सांगुन उर्वरीत 20,000/- रू कोर्टामध्ये से रिपोर्ट दिल्यानंतर देण्यास सांगितले. त्यावरून पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीमध्ये खाजगी इसम मुन्तसिरखान पठाण यांनी मानवत येथील हाटकर समाज मंगल कार्यालयाच्या समोर, नारायण नगर येथे वेळ अंदाजे 13.53 वाजेच्या पुर्वी लाच रक्कम 50,000/- रू पंचासमक्ष स्विकारून तो मोटार सायकलने पळुन जावुन पुराव्याची लाच रक्कम लपवुन पुरावा नष्ट केला आहे. म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष फिर्यादि दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DIPAK LAXMAN DANTULWAR(I (Inspector)) / BCMH94137 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): श्री अशोक इप्पर, पो.उप.अधीक्षक लाप्रवि परभणी.

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस निरिक्षक

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DIPAK LAXMAN DAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH94137

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.मानवत